**सी.एन.आर.क्र.एम.एच.एस.आय. ०९-००००३६-२०१७**

## नियमित दिवाणी दावा क्र. १२/२०१७

## निशाणी क्र. १७३ वरील आदेश

प्रस्ततुचा अर्ज वादी यांनी प्रतिवादी क्र.१२ चे वारस अभिलेखावर आणणेस झालेला विलंब माफ होवून त्याचे वारस रेकॉर्ड घेवून तशी दुरुस्ती करणेसाठी दाखल केला आहे.

०२. वादी यांनी आपल्या अर्जात असे कथन केले आहे की, प्रस्तुत कामी प्रतिवादी क्र.१२ प्रमोदिनी विलास केळकर या दि.१०/११/२०२४ रोजी मयत झाल्या आहेत हे वादी यांना समजले आहे. प्रतिवादीचे मृत्यूला ९० दिवस उलटून गेले असल्याने तांत्रिकदृष्टया वादीचा दावा अबेट झाला आहे. तसेच, विहीत मुदतीत प्रतिवादीचे वारसांची तजवीज करता आली नव्हती. तरी वादीचा दावा पुढे चालविण्याच्या दृष्टीने प्रतिवादीचे वारस रेकॉर्डवर आणण्याकरिता झालेला विलंब माफ करण्यात येवून प्रतिवादी क्र.१२ चे वारस दाखल करण्याची परवानगी मिळावी अशी विनंती वादीने केली आहे.

३. प्रतिवादी यांनी प्रस्तुत अर्जावर म्हणणे दाखल करुन विरोध दर्शवला आहे. त्यांच्या म्हणण्यानुसार वादीने दिलेले कारण संयुक्तिक नाही. सबब, सदरचा अर्ज खर्चासह नामंजूर करण्यात यावा.

४. या ठिकाणी हे नमूद करणे आवश्यक आहे की, वादीने निशाणी क्र.११७ येथे मयत प्रतिवादी क्र.१२ यांचा मृत्यूचा दाखला हजर केला आहे. सदरच्या मृत्यू दाखल्याचे अवलोकन केले असता प्रतिवादी क्र.१२ प्रमोदिनी विलास केळकर या दि.१०/११/२०२४ रोजी मयत झाल्याचे दिसून येते. प्रस्तुतचा अर्ज वादीने उशिराने दाखल केलेला आहे. वादीचे विलंबाचे नमुद केलेले कारण स्विकारार्ह नाही. प्रस्तुतचा दावा हा ठराव व निरंतर ताकिदीसाठी दाखल

केलेला आहे. मात्र न्यायालयास परिणामकारक व परिपुर्ण निवाडा करताना व वादी, प्रतिवादी यांच्यामध्ये असलेले वादाचे संपुर्ण निराकरण एकाच दाव्यामध्ये होणेसाठी न्यायतत्वाच्या दृष्टीकोनातून प्रस्तुतचा अर्ज मंजूर करणे आवश्यक आहे. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## - आदेश -

१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. वादीने जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, सिंधुदुर्ग यांस खर्चाची रक्कम रुपये १००/- देण्याच्या अटीवर मयत प्रतिवादी क्र.१२ यांचे वारस अभिलेखावर आणणेस झालेला विलंब माफ करणेत येत आहे.

NANDA BAPUSO GHATAGE
Digitally signed by NANDA BAPUSO GHATAGE
Date: 2025.03.28 17:31:58 +0530

( श्रीमती एन.बी.घाटगे )
दिनांकः २६/०३/२०२५ दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर देवगड.